दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १७७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०७ फेब्रुवारी २०२५




# काँग्रेसनं आंबेडकरांचा तिरस्कार केला : पंतप्रधान मोदींची टीका



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, दिल्ली :** काँग्रेस पक्षाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल राग होता. त्यांच्या प्रत्येक कृतीवर काँग्रेसकडून नाराजी व्यक्त केली जायची. याचे ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध आहेत. आंबेडकरांना दोनवेळा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी काँग्रेसने काय काय नाही केले. एवढेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारत रत्न पुरस्कार देण्याच्या पात्रतेचेही ते समजत नव्हते, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत बोलताना केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावर बोलत असताना मोदींनी काँग्रेसवर आरोपींच्या फैरी झाडल्या. या देशातील सर्व समाजाच्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भावनेचा आदर केला. त्यांना सन्मान दिला. त्यानंतर आज नाईलाजाने काँग्रेसला जय भीम बोलावे लागत आहे. जय भीम बोलताना त्यांचे तोंड सुकते. काँग्रेस रंग बदलण्यात चांगलीच पटाईत आहे. ते इतक्या वेगात आपला मुखवटा बदलतात, हे यातून सिद्ध होते, अशीही टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केली. म्हणून काँग्रेसची दुर्दशा झाली

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, आम्ही ज्याप्रमाणे 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा दिली. त्याप्रमाणे काँग्रेसने नेहमीच दुसऱ्याची रेषा छोटी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांनी अनेक सरकार अस्थिर केले. इतर पक्षांचे सरकार स्थापन झाल्यानंतर त्यांना अस्थिर केले. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसबरोबर असणारे पक्षही पळून जात आहेत. काँग्रेसच्या सवयींमुळेच आज देशातील सर्वात जुन्या पक्षाची दुर्दशा झाली आहे. मी आज काँग्रेसला न मागता सल्ला देतो की, त्यांनी दुसऱ्याची रेषा छोटी करण्यापेक्षा स्वतःची रेषा मोठी करण्यासाठी मेहनत घ्यावी. म्हणजे देशातील जनता तुमचा पुन्हा विचार करेल.

## चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी टीम इंडियाची जय्यत तयारी...

# भारताचा इंग्लंडवर सहज विजय, गिल-अय्यर-अक्षरची वादळी खेळी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नागपूर :** शुबमन गिलची ८७ धावांची खेळी, श्रेयस अय्यरची वादळी आणि महत्त्वपूर्ण फटकेबाजी, संकटमोचक अक्षर पटेलचं अर्धशतक अन् भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी यासह भारतीय संघाने इंग्लंड संघावर पहिल्या वनडेत सहज विजय मिळवला आहे. इंग्लंडवरील ५ विकेट्सने मिळवलेल्या विजयासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी चांगल्या लयीत असल्याचे दाखवून दिले आहे. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेला इंग्लंड २४८ धावा करत ४७.४ षटकांत सर्वबाद झाला. तर भारताने ३८.४ षटकांत इंग्लंडवर ५ विकेट्सने विजय नोंदवला.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीसाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या मालिकेसाठी टीम इंडिया दीर्घ कालावधीनंतर एकदिवसीय क्रिकेट खेळत होती. पण भारताने या सामन्यात चांगली कामगिरी करत टीम इंडिया तयारीत असल्याचे दिसत आहे. यापूर्वी, भारतीय संघाने जुलै-ऑगस्टमध्ये श्रीलंका दौऱ्यावर ३ एकदिवसीय सामने खेळले होते, जी विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यानंतर भारताची पहिली आणि एकमेव एकदिवसीय मालिका होती. इंग्लंडचा संघ २४८ धावांवर सर्वबाद

भारतीय संघाने या सामन्यात प्रथम गोलंदाजी करत मोहम्मद शमीने दमदार सुरुवात केली. पण दुसऱ्या बाजूने इंग्लिश सलामीवीराने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाची चांगलीच धुलाई केली. फिल सॉल्ट आणि बेन डकेटने अवघ्या ९ षटकांत ७५ धावा करत जोरदार सुरूवात केली. पण फिल सॉल्ट धावबाद झाल्यानंतर टीम इंडियाने पुनरागमन केलं. यात हर्षितची महत्त्वाची भूमिका महत्त्वाची होती. त्याने आधी बेन डकेट (३२) आणि नंतर हॅरी ब्रूक (०) यांची विकेट घेतली. रवींद्र जडेजाने पुन्हा जो रूटला (१९) आपला बळी बनवले.

मधल्या फळीत कर्णधार जोस बटलरसह युवा अष्टपैलू जेकब बेथलने संघाचा डाव उचलून धरला. प्रथम बटलरने (५२) अर्धशतक झळकावले आणि नंतर तो बाद झाल्यानंतर जेकब बॅथल (५१) यांनी संघाला २०० धावांचा टप्पा गाठून दिला. त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले मात्र तोही जडेजाच्या गोलंदाजीवर बाद झाला. शेवटी, जोफ्रा आर्चरने (२१) काही मोठे फटके मारले आणि संघाला २४८ धावांपर्यंत नेले. हर्षित आणि जडेजाने प्रत्येकी ३ विकेट घेतले, तर शमी, अक्षर आणि कुलदीप यादव यांना १-१ विकेट मिळवण्यात यश मिळाले.

२४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पदार्पणवीर यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार रोहित शर्माने सुरूवात केली. पण आर्चर आणि साकिब महमूद यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीसमोर फारश्या धावा दोघांना करता आल्या नाहीत आणि दोघेही



झेलबाद होत माघारी परतले. कर्णधार रोहितने (२) पुन्हा एकदा निराशा केले. कसोटी फॉर्मेटमध्ये त्याचा खराब फॉर्म वनडेमध्येही कायम राहिला.

**श्रेयस अय्यरचं 'वादळी' पुनरागमन !**

रोहित बाद झाल्यानंतर मैदानावर आलेल्या श्रेयस अय्यरने आक्रमक सुरूवात केली आणि भारतीय संघात पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केलं. श्रेयस अय्यर आणि शुबमन गिल यांनी दमदार खेळी करत विजयाचा पाया रचला. विशेषतः, अय्यरने येताच आक्रमक फलंदाजी केली आणि आर्चरच्या षटकात २ षटकार आणि १ चौकारा लगावत आपले मनसुबे जाहीर केले. अय्यरने अवघ्या ३० चेंडूत अर्धशतक झळकावले पण त्याला आपल्या डावाचे मोठ्या धावसंख्येमध्ये रूपांतर करता आले नाही.

श्रेयस अय्यर बाद झाल्यानंतर अक्षरला बढती मिळाली आणि त्याने गिलबरोबर १०८ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे विजय निश्चित झाला. अर्धशतक झळकावल्यानंतर अक्षर आदिल रशीदच्या गोलंदाजीवर बाद झाला, तर शुबमन गिल त्याच्या शतकापूर्वी ८७ धावांवर बाद झाला. यानंतर हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजाने संघाला विजयापर्यंत नेले.

# बुलडाणा जिल्ह्यात अजित पवार गटात वादळ !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बुलडाणा :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनुजा सावळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या राजीनाम्याचे खापर जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांच्यावर फोडत त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. दुसरीकडे त्यांना अगोदरच निष्काशित करण्यात आल्याचे सांगून हे त्यांचे राजीनामा नाट्य असल्याचा पलटवार जिल्हाध्यक्ष नाझेर काझी व त्यांच्या समर्थकानी केला आहे.

अजित पवार गटाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनुजा सावळे यांनी या अंतर्गत वादाला तोंड फोडले. आपल्या 'फेसबुक पेज'वर त्यांनी राजीनाम्याची पोस्ट केली आहे. राजीनाम्यावर तारीख १९ डिसेंबर असली तरी त्यांनी आज समाज माध्यमावर राजीनामा पत्र टाकले. यामागे त्यांचा हेतू काय होता हे त्यांनाच माहित. गेल्या ४ वर्षापासून मी निष्ठेने पक्षाचे काम केले, प्रामाणिकपणे महिला संघटनेचे काम वाढवले मात्र जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांनी सतत अपमानजनक वागणूक दिल्याचे त्यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे. निष्ठावान लोकांना डावलून पक्ष संघटना टिकणार नाही, जातीयवाद फोफावला तर सामान्यांना न्याय मिळणार नाही. मराठा समाजातील सक्षम महिला म्हणून अशा प्रकारे मला राजीनामा द्यावा लागणे निराशाजनक असल्याचेही अनुजा सावळे यांनी राजीनामा पत्रात नमूद केले. दरम्यान, यामुळे शांत असलेल्या अजित पवार गटात काहीसे वादळ उठले.

**'हे तर राजीनामा नाट्य'**

यासंदर्भात अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष ॲड नाझेर काझी यांना विचारणा केली असता त्यांनी अनुजा सावळे यांनी केलेले आरोप फेटाळून लावले. हे आरोप साफ चुकीचे असल्याचे सांगून याउलट त्यांनी विधानसभा निवडणुकीत पक्ष विरोधी कामे केली. त्यांनी सिंदखेड राजा मतदासंघांचे उमेदवार मनोज कायंदे यांचा प्रचार केला नाही. महिलांचा अपमान करणे ही आपली आणि पक्षाची संस्कृती नाही. त्यांनी डिसेंबरमध्ये राजीनामा दिला आहे, आता पोस्ट टाकली. हे त्यांचे राजीनामा नाट्य असल्याचे काझी म्हणाले.



यापाठोपाठ ज्येष्ठ नेते तुकाराम अंभोरे पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष मनीष बोरकर आदि पदाधिकाऱ्यांनी या वादात उडी घेत अनुजा सावळे यांचे आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगितले. अंभोरे यांनी पक्षविरोधी कारवाया मुळे सावळे यांना पूर्वीच निष्काशीत करण्यात आले आहे. सिंदखेड राजा मतदार संघाच्या लढतीत त्यांनी उमेदवार मनोज कायंदे यांच्या विरोधात काम केले आहे. त्याची तक्रार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, रुपाली चाकणकर यांच्याकडे तेंव्हाच करण्यात आली. त्यांना निष्काशीत सुद्धा करण्यात आल्याचे अंभोरे यांनी स्पष्ट केले आहे.

**पेल्यातील वादळ !**

दरम्यान या वादामुळे अजितदादा गोटात वादळ निर्माण झाले असले तरी टे पेल्यातील वादळच ठरण्याची चिन्हे आहे. एकसंघ राष्ट्रवादी ते शरद पवार गटचे आणि सध्या अजितदादा गटचे जिल्हाध्यक्ष, सिंदखेड राजा पालिकेचे अध्यक्ष असा ॲड काझी यांचा राजकीय प्रवास राहिला. त्यांना जिल्ह्यातील एकमेव आमदार मनोज कायंदे व पदाधिकाऱ्यांचे समर्थन असल्याचे सावळे यांच्या आरोप नंतर दिसून आले. यामुळे अनुजा सावळे या एकाकी पडल्याचे चित्र आहे. यामुळे (ना)राजीनामा नाट्य पेल्यातील वादळ ठरण्याची चिन्हे आहे.

## ठाणे जिल्हयासाठी स्थानिक सुट्टया जाहीर

**दि.०६, नवी मुंबई :** ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासकीय कार्यालयांसाठी शासनाने सन २०२५ करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरीक्त तीन सार्वजनिक सुट्टया कोंकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी परिपत्रकाव्दारे जाहीर केल्या आहेत. ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता शासनाने सन २०२५ करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टयांव्यतिरिक्त दि. ०८ ऑगस्ट २०२५ शुक्रवार नारळी पौर्णिमा, दि. ०२ सप्टेंबर २०२५ मंगळवार जेष्ठागौरी विसर्जन, दि. २० ऑक्टोंबर २०२५ सोमवार नरक चतुर्दशी या तीन स्थानिक सुट्टया जाहीर करण्यात आल्या आहेत. शासन ठराव राजनैतिक व सेवा विभागाकडील दि. १६ जानेवारी १९५८ च्या निर्णयातील परिच्छेद क्र. ५ अन्वये विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हे करण्यात आले आहे. या दिवशी ठाणे जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहतील. असे कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## थोडक्यात

### देवेंद्र फडणवीस यांची द्वारकानाथ संझगिरी यांना श्रद्धांजली

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, ठाणे :** महाराष्ट्राच्या क्रिकेट प्रेमाची ख्याती जगभर पोहोचवणारा व मिरवणारा आवाज या खेळातील संज्ञेप्रमाणेच अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या द्वारकानाथ संझगिरी यांच्या निधनामुळे आज निमाला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, महाराष्ट्राचे क्रिकेट प्रेम सवश्रृत आहे. पण या प्रेमाची जगभर ख्याती मिरवण्याची किमया संझगिरी यांनी साधली. क्रिकेट सामन्यांचे ओघवत्या शैलीतील त्यांच्या वृत्तांकनांचा चाहता वर्ग मोठा आहे. त्यांचे क्रिकेट समीक्षण रसरशीत आणि तितकेच रोमांचक असे. क्रिकेट शिवाय नाटक, चित्रपटांचे लेखन यांसह अनेकविध क्षेत्रात त्यांनी मुशाफिरी केली. क्रिकेट या खेळावर त्यांनी अखेरपर्यंत निस्सीम प्रेम केले. त्यांच्या निधनाने एक उत्कट क्रीडाप्रेमी, क्रिकेट विषयीच्या लेखन- समीक्षणाने मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांचे चाहते, कुटुंबियांच्या आम्ही दुःखात सहभागी आहोत, असे नमूद करून, मुख्यमंत्री फडणवीस यांनी ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### रिक्षा-डंपरच्या धडकेत एक ठार, एक जखमी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पुणे :** रिक्षा आणि डंपरची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात रिक्षातील एक प्रवाशी ठार झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे. कात्रज जुन्या बोगद्यातून पुढे मांगडेवाडी परिसरात बुधवारी (५ फेब्रुवारी) दुपारी दीडच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातामध्ये अर्जुन राय यांचा मृत्यू झाला असून विजयकुमार यादव गंभीर जखमी झाला आहे. सरोजकुमार सदाय (वय ३८ रा. वेळू ता. भोर जि. पुणे) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी रिक्षा आणि डंपर चालकांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डंपर चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष बेदरकारपणाने डंपर चालवला. तर, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी रिक्षामध्ये बसवून रिक्षाचालकाने भरधाव वेगाने रिक्षा चालविली. मांगडेवाडी परिसरात दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन रिक्षामध्ये बसलेला फिर्यादीचा साडु आणि मेहुणी असे किरकोळ जखमी झाले. अर्जुन राय यांचा मृत्यू झाला असून विजयकुमार यादव गंभीर जखमी झाला. या मृत्यूस दोन्ही वाहनांचे चालक हे कारणीभूत ठरले आहेत. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक व्ही. बी. दोडमिसे तपास करीत आहेत.

# संपादकीय



## हिमालयाची सावली

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आत्महत्या केली की सुटका होते का ?

संत तुकाराम महाराज याचे ११ वे वंशज हरी भक्त परायण शिरीष महाराज मोरे यांनी केलेल्या आत्महत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. याआधी भय्यूजी महाराज यांनीसुद्धा अशाच प्रकारे मृत्यूला कवटाळले होते. ज्यांना अध्यात्म कळले आहे, ज्यांना प्रारब्ध आणि क्रियमाण कळले आहे, ज्यांना कर्मफळ न्याय कळला आहे, जे इतरांना अध्यात्मिक उपदेश देतात अशा विभूतींनी आत्महत्येसारखा मार्ग स्वीकारणे मनाला रुचत नाही. प्रतिदिन वृत्तपत्रांतून कितीतरी आत्महत्येच्या घटना वाचण्यात येतात. अगदी आठ नऊ वर्षांच्या बालकापासून ते ८०-९० वर्षांच्या वृद्धांपर्यंत लोक मनाविरुद्ध घडले, संकटावर मात करण्याची इच्छाशक्ती संपली आत्महत्येसारखा मार्ग स्वीकारतात. मागील २-३ वर्षांत सुप्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंग राजपूत आणि अनेक गाजलेल्या चित्रपटांचे आणि मालिकांचे कला दिग्दर्शन करणारे देसाई यांच्या आत्महत्या विशेष गाजल्या. याआधीही चित्रपट क्षेत्रातील अनेक निर्माता, दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्रींनीं वेगवेगळ्या कारणांमुळे आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे. आजमितीला असे एकही क्षेत्र नाही जिथे आत्महत्या होत नाहीत. अध्यात्मशास्त्रानुसार ८४ लक्ष योनींचा फेरा पूर्ण झाल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो. असा अनमोल जन्म सहजपणे संपवणे योग्य आहे का ?

एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. हा आकडा दोन लाखांच्या घरात असतो, त्यातील एक लाख हे १५ ते ३५ वयोगटांतील असतात, नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ? परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या



पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याला घालून पाडून बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते. व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात.

ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ?दुर्धरआजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारिरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात.

आत्महत्या करणाऱ्यांच्याप्रति समाज सहानुभूती दाखवत असला तरी भारतीय संविधानानुसार तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आत्महत्या केली म्हणजे सुटका होईल या विचाराने आत्महत्या करणारा हे धाडस करतो, मात्र ही खऱ्या अर्थाने सुटका नसतेच असे अध्यात्म सांगते. अध्यात्मानुसार मानवासह प्रत्येक प्राणीमात्राच्या जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपवण्यासाठी झालेला असतो. त्यामुळे जन्म आणि मृत्यू हे विधिलिखित असते. त्यामध्ये ढवळाढवळ करून स्वतःहून मृत्यू ओढवून घेतल्यास पृथ्वी लोकातील समस्यांपासून सुटका मिळेल; मात्र विधात्याच्या नियोजनात हस्तक्षेप केल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचा आत्मा पुढील अनेक वर्षे भुवलोकात हालअपेष्टा सहन करत तडफडत असतो. त्या सहन करून संपवल्याशिवाय त्याला पुढच्या योनीमध्ये जन्म मिळत नाही. ८४ लक्ष योनींचा फेरा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या मनुष्य जन्माचे सार्थक करणे विधात्याला अपेक्षित असते; मात्र स्वतःच्या कर्मदरिद्रीपणाने आत्महत्येसारखी पळवाट स्वीकारणाऱ्याची मृत्यूनंतरही सुटका नसते. त्यामुळे आत्महत्या करून सूटका होते हा केवळ गैरसमज आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## स्किम विमा...




गैर व्यवहारे पोखरे
गाजतो पीक विमा
भरोसा नाही उरला
विम्याचा हवा विमा

प्रश्न सतावितो मना
क्लेम वेग का धिमा
क्लिष्ट कायदे नियम
खेळत बसले झिम्मा

चुकीचे विमा धारक
ये मोठाले लवाजमा
मूळ भल्या उद्देशांचा
होतो पुराभुगा खिमा

केवळ भरायचे हप्ते
किंमत नसे का घामा
गंडवायचे फंडे हजार
ग्राहकाचा करी मामा

अभेद्य कवच रे विमा
नको भ्रामक मुलामा
कोण मालक नौकर
नाचवत राहे गुलामा

विमाकंपनी फोफावे
मैदान मिळते उद्यमा
भ्रष्टाचार कुरण माते
खाद्य देई तो अधमा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## उघड्या डोळ्यांनी स्वप्न पाहा अन् यशाचे शिखर गाठा- सिताराम खिलारी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यशाचे शिखर गाठायचे असेल तर उभ्या आयुष्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी. यासाठी मोठी स्वप्न पाहावीत, मात्र ती उघड्या डोळ्यांनी पाहताना प्रत्यक्षात आणि वास्तवात साकारता येणारी असावीत. यातून यशाचे शिखर गाठता येते, असे आवाहन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील श्री. ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १२ वी कला आणि सायन्सच्या निरोप समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिताराम खिलारी होते. कु. अंकिता खराबी, कु. ऋतुजा गुंजाळ, कु.



ज्ञानेश्वरी झावरे, कु. सायली माकरे, कु. शुभम कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील काही अनुभव सांगितले. शास्त्र विभाग समन्वयक अशोक गांगड,कला विभाग समन्वयक विजय सोबले यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पुढे सिताराम खिलारी म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवनात नेहमीच सकारात्मकता अंगी बाळगायला हवी. आत्मविश्वास ठेवायला हवा.

जीवनात शिस्त, संस्कार, आचार, विचार असायला हवेत. शिक्षणातून समाजात परिवर्तन घडते. मनात जिद्द, चिकाटी व परिश्रम करण्याची तयारी ठेवल्यास निश्चित यशाचे शिखर गाठता येते, असे बोलताना खिलारी यांनी सांगितले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी,जेष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, शिवाजी नरसाळे, गोवर्धन मते, अशोक वाघ, पोपटराव जगदाळे,अतिष झावरे, सुनील झावरे, अनिकेत बांगर, रामदास नरवडे, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, सुंबे मॅडम, योगेश मांडगे, भाऊसाहेब खोसे, यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र ढोणे यांनी केले तर आभार प्रदर्शन मिना खाडे यांनी मानले.

## महापालिकेच्यावतीने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये 'पर्यावरण सेवा योजना बैठक'

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, पनवेल :** माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षणाचे महत्व शालेय, स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये 'पर्यावरण सेवा योजना बैठक' उपक्रम पनवेल महानगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये 'पर्यावरण सेवा योजना बैठकीचे' आयोजन करण्यात आले.

पर्यावरण सेवा योजना अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये ५० विद्यार्थ्यांचे युनिट बनविले जात आहे. या युनिटचा विद्यार्थ्यांचा एक प्रतिनिधी व एक विद्यार्थ्यांनी



प्रतिनिधी बनविले जात आहे. या योजनेंतर्गत झालेल्या बैठकीत लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये ५० विद्यार्थ्यांचे युनिट बनविले असून या युनिटमधील विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी व विद्यार्थ्यांनी प्रतिनिधीची निवड यावेळी करण्यात आली.

याबरोबरच माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार महापालिका कार्यक्षेत्रातील विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे,व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये करण्यात आले.

'पर्यावरण तास' या उपक्रमांतर्गत झालेल्या चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी माझी वसुंधराची शपथ घेतली. याप्रसंगी शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व विद्यालयाचे मुख्याध्यापक वाल्मिक राठोड यांचे सहकार्य लाभले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रांजणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मागासवर्गियांना कुकर वाटप



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि,०५, सुपा (अ.नगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव ग्रामपंचायती मार्फत १५% मागासवर्गियांना ५२ लाभार्थियांना कुकरचे वाटप करण्यात आले.

पारनेरतालुक्याचा बुलंद आवाज तरुणांच आधास्तंभ असलेले राहुल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित गावचे सरपंच संध्याताई देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे, ग्रामविकास अधिकारी गायकवाड, तात्याभाउ निर्वाण, मा.सरपंच बंटी साबळे, भाउ देशमुख, शरद सरोदे, मोहण लोणकर, दत्ता लोणकर, महेश देशमुख, बाबा जवक, सेवा सोसायटीचे नवनिर्वाचीत चेअरमन अनिल जवक अदी, मागासवर्गिय लाभार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## सुतार गल्ली येथील सार्वजनिक शौचालय प्रशासन नगरपालिकेने पाडले




**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि,०५, पेठवडगांव :** वडगांव शहरातील सुतार गल्ली परिसरातील गेल्या पंधरा वर्षा पासून अस्तित्वात असलेले सार्वजनिक शौचालय नगर पालिकाने पाडले आहे. त्यामुळे सुतारगल्ली परिसरातील जनतेची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. यासाठी युवक क्रांती आघाडीने पालिका प्रशासनास निवेदन दिले आहे. लवकरात लवकर पर्यायी व्यवस्था करून द्यावी.

हजारे कॉर्नर पासून नागोबा गल्ली पूल इथपर्यंत चे रहिवासी शौचालय चा वापर करत होते. कोणालाही काहीही कल्पना न देता नगरपालिका प्रशासनाने ती शौचालय पाडण्यात आली. त्यामुळे स्थानिक नागरिक व काही समाज कार्यकर्ते संतप्त झालेली दिसत आहेत. या वेळी युवक क्रांती महाआघाडीच्या वतीने प्रविता सालपे, अजय थोरात, रंगराव पाटील, शरद पाटील, शरद गुरव, रमेश शिंपणेकर, संतोष ताईंगडे, दीपक खरोशे प्रकाश बुचडे, अशोक झगडे, रमेश बेलेकर, सुधीर पोळ, हेमंत पाटील, अक्षय मदने यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी या मागणीचे निवेदन प्रशासनास देण्यात आले.

## महाबळेश्वरच्या 'सबा' चे देशसेवेचे स्वप्न साकार !

**अक्षराज : प्रतिनिधी वृत्तसंकलन**

**दि.०६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर येथील सलिम महापुळे यांची कन्या सबा हिचा जन्म सर्वसामान्य कुंटुबात झाला. सबा हिचे प्राथमिक शिक्षण उर्दू शाळा क्र.३ महाबळेश्वर येथे झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण छाबडा स्कूल येथे झाले. विद्यानिकेतन पांचगणी येथे १२वी पर्यंत शिक्षण घेतले. सबाने क्रिडाक्षेत्रात फुटबॉल या खेळामध्ये अतुलनीय कामगिरी बजावली असून ती राष्ट्रीय खेळाडू आहे. पुणे एमआयटी येथे शिक्षण घेत असताना तिने सैन्य दलात भरती होण्याच्या उद्देशान युपीएससी, संरक्षण सेवा या लेखा परीक्षेची तयारी केली. यानंतर लेखी परीक्षा पास झाल्यानंतर भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्यासाठी सेवामंडळ मुलाखतीची तयारी केली. मध्यप्रदेश येथील भोपाळ, उत्तरप्रदेश येथील प्रयागराज, गुजरात येथील गांधीनगर तसेच कर्नाटक येथील बंगळूर या शहरात मुलाखती दिल्या. त्याच प्रमाणे भारतीय हवाई दलाची एएफसीटी परीक्षेसह केंद्रीय सशस्त्र दल व एसएसीस च्या परिक्षांमध्ये यश संपादन केले. हे यश मिळवून महाबळेश्वर तालुक्यातून सैन्यदलात नियुक्ती झालेली पहिला महिला ठरली आहे. ह्या तीच्या संघर्षमय प्रवासात तिला तिच्या आई सलिमा व वडील सलीम महापुळे यांची मोलाची साथ लाभली आहे. सबाची सैन्यदलात झालेली निवड ही इतरांना प्रेरणादायी असून या मुळे तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

> सैन्य दलात आखेरच्या श्वासा पर्यत माझी देशाची सेवा करण्याचे स्वप्न आहे या प्रवाशात अनेक चढ उतार आले यामुळे स्वतः मध्ये अनेक बदल करत गेले त्यामुळेच कठीण परिस्थितीत ही मी यशस्वी झाले' लेहरों से डरकर कभी नौका पार नही होती कोशिश करने वालो की कभी हार नहीं होती.
>
> **- सबा महापुळे**

## साथ रोग नियंत्रणासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा अंतर्गत सर्वेक्षण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.६, विंचूर (नाशिक) :** निमगाव वाकडा कार्यक्षेत्रातील साथीचे आजार उद्भवल्यास त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा अंतर्गत घरांना एम नंबर देऊन शिरगणतीसह कुटुंब सर्वेक्षण करून आराखडा करण्यात येत आहे. तसेच गावागावातील गप्पी मासे पैदास केंद्र डास उत्पती स्थानाची पाहणी करून, निरीक्षण नोंदवून, ग्राम पंचायतींना उपायोजनांची अंमलबजावणीच्या सूचना करण्यात येत आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सुनिता पिवळतकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजित कोशिरे यांच्या मार्गदर्शनाखाली, ८ आरोग्य सेवक, ४३ आशा वर्कर लासलगाव, विंचूर, पिंपळगाव नजीक, पाचोरे बुद्रुक या गावांमध्ये उपकेंद्रामार्फत, घरांना एम नंबर देऊन, आराखडा करून कुटुंब सर्वेक्षण करीत आहे. सदर कामाची पाहणी तालुका आरोग्य पर्यवेक्षक राजेंद्र सानप व आरोग्य निरीक्षक चंद्रभान धोंडे हे करत आहे. एम नंबर आराखड्याचे महत्त्व या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारची उदा. मलेरिया, डेंगू, चिकनगुनिया तसेच दूषित पाण्याद्वारे कोणत्याही प्रकारची साथ उद्भवल्यास सदर प्रकारची साथ नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने कोणकोणत्या अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सदर गावातील घरी भेट दिली. काय उपाययोजना अमलात आणल्या, याबाबत माहिती मिळू शकेल. तसेच कार्यक्षेत्रात उद्भवलेल्या साथीचा केंद्रबिंदू शोधण्यास तात्काळ मदत होईल. एखाद्या आजाराचा रुग्ण तालुक्याच्या बाहेरून आल्यास, त्याला शोधण्यास एम नंबर आराखड्यामुळे मदत होईल. अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या भेटीने निदर्शनास येतील. अशी माहिती वैद्यकीय अधिकारी प्रा. आरोग्य केंद्र निमगाव वाकडा डॉ. अविनाश पाटील व डॉ. वरुणराज ठाकरे यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील तायक्कांदोपटू खेळाडूंची प्रशिक्षकांसाठी झुंज

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंचा संघर्ष सुरूच !!



**अक्षराज : संदिप येवले**

**दि,०६, मुंबई :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंना आवश्यक पायाभूत सुविधा आणि किटसाठी झगडावे लागले असतानाच आता महाराष्ट्राची तायक्कांदोची टीम हल्दवानी येथे मुळ प्रशिक्षकांसाठी संघर्ष करत आहे.

महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेने राज्य संघटनेकडून निवडलेल्या मुळ अनुभवी प्रशिक्षकांना डावलून, नवख्या प्रशिक्षकांची नियुक्ती केली असून, महाराष्ट्रातील निवडलेल्या २४ खेळाडूंनी आपल्या मुळ प्रशिक्षकांसाठी आग्रह धरला आहे. खेळाडूंना ज्या प्रशिक्षकांनी त्यांना घडवले त्यांना डावलून 'एमओए' सचिवांनी नवख्या प्रशिक्षकांची नियुक्ती केली आहे. या निर्णयाचा फटका महाराष्ट्र तायक्कांदोपटूंना बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. गतवर्षी गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना स्पर्धे दरम्यान किट मिळाले नाही, या ही वर्षी खेळाडूंना किटसाठी उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्री यांच्या कडे दाद मागावी लागली, आता प्रशिक्षकांसाठी झगडण्याची वेळ महाराष्ट्राच्या तायक्कांदोपटूंवर आली आहे. खेळाडूंचे एक प्रकारे मनोधैर्य कमी करण्याचाच हा प्रकार असून, मैदाना बाहेर संघर्ष करताना महाराष्ट्रातील खेळाडूंनी या राष्ट्रीय स्पर्धेत आपला नैर्सगीक खेळ कसा करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

गोवा येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना पाच महिन्यानंतर किट मिळाल्याची बाब समोर आली आहे. तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाने न्यायालयाच्या आदेशानुसार ४० व्या राष्ट्रीय वरिष्ठ क्यरोगी आणि १३ व्या राष्ट्रीय वरिष्ठ पुम्से तायक्कांदो अजिंक्यपद २०२४ स्पर्धेत प्रत्येक वजन गटातील पात्र ८ खेळाडूंची निवड या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी केली आहे. हे खेळाडू ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवडले गेले आहेत. महाराष्ट्र संघाची पात्र खेळाडूंची निवड यादी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाकडून पाठविण्या आल्या नंतर, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेने तिची माहिती महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेला वेळोवेळी देण्यात आली आहे. या खेळाडूंना उत्तराखंड येथे सुरू असलेल्या ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी पाठविण्यासाठी आवश्यक किटसह पायाभूत सर्व सुविधांची स्पर्धेपूर्वी वेळेत उपलब्ध करून देण्यात यावी, असेही निवेदन खेळाडू व प्रशिक्षक यांच्या कडून महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री अजीतदादा पवार व क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना देण्यात आले आहे. मंगळवारी काही साहित्य खेळाडूंना मिळाले परंतु अद्यापही खेळाडूंना आपल्या मुळ अनुभवी प्रशिक्षकांसाठी संघर्ष करावा लागतो आहे.

**महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेला पत्र**

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेने म्हटले की, दिल्ली उच्च न्यायालयाच्या २४ डिसेंबर २०२४ रोजीच्या आदेशाचे तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया ही अधिकृत राष्ट्रीय क्रीडा महासंघ असल्याने निवड प्रक्रियेत कोणत्याही इतर संस्थेचा हस्तक्षेप करता येणार नाही.

गत गोवा येथील ३७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील तायक्कांदो खेळाडूंना वेळेत सुविधा प्राप्त झाले नाहीत, याची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घ्यावी. याला सकारात्मक प्रतिसाद देऊन महाराष्ट्र खेळाडूंसाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि किट उपलब्ध करून देण्यात यावे, असे पत्रात म्हटले आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा धडाकेबाज निर्णय..



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.६, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव येथील ९३ नंबर सबंधित भोगवटदार वर्ग २ च्या जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी मुदतवाढ दिल्याने वर्षोन वर्ष प्रलंबित असलेला लासलगाव येथील प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन रावजी भुजबळ आणि भाजपा महामंत्री सुवर्णा जगताप यांच्या पाठपुराव्या नंतर लासलगाव शिष्ठ मंडळास शैलेश ठाकरे, मयूर झांबरे व सत्ता समितीचे सदस्य यांनी बावणकुळे साहेबांची भेट घेऊन चर्चा केली. लगेचच महाराष्ट्रात बाकीच्या केसेसची पण दखल घेऊन, कालच्या मंत्री मंडळाच्या सभेत प्रश्न मांडून जीआर काढला. तळागाळातील लोकांचे प्रश्न समजून घेऊन प्रश्न मार्गी लावण्यास सरकार किती तत्पर आहे हेच कालच्या महसूलमंत्री मा बावणकुळे साहेबांच्या निर्णयाने दिसून आले. त्यासाठी महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावणकुळे यांचे मनपूर्वक धन्यवाद व्यक्त केले.

> शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसंच सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्यानं किंवा कब्जेहक्कानं दिलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षाची मुदत वाढ.
>
> महसूल मंत्री बावनकुळे साहेबांची काल कॅबिनेट पूर्वी भेट घेतली. साहेबांनी हा विषय मार्गी लावला. शर्तभंग प्रकरने नियमित करण्यासाठी लवकरच मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.
>
> **- सुवर्णा जगताप (माजी सभापती, लासलगाव बाजार समिती)**

# 'आरटीई' प्रवेशासाठी पालकांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये - मुख्य का.अ.रोहन घुगे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.५, ठाणे :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार आरटीई २५ टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला/ मुलींसाठी राखीव ठेवण्याची तरतुद आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये, असे अवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी यांची शाळानिहाय यादी घोषित केली जाते.

गैरप्रकार निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ प्रशासन अधिकारी मनपा/ नपा, संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे (depmh2gmail.com), आयुक्त (शिक्षण), पुणे (educommofficegmail.com) यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदविण्यात यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार फौजदार स्वरुपाची कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी बालकांच्या पालकांनी सहकार्य करावे, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी आवाहन केले आहे.

# नाट्यवाचन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पुणे :** मातृभाषा अध्यापक संस्था पुणे व रोटरी क्लब पुणे पर्वती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या महिन्यात नाट्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. अनेक शाळांनी यात अगदी उत्स्फूर्त सहभाग दाखवला होता. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला.

ज्ञानप्रबोधिनी शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. त्याचे सादरीकरण झाले. लहान गट ,मोठा गट, वाचिक अभिनय, वैयक्तिक, शिक्षक नाट्य संहिता लेखन, सांघिक असे सन्मान करण्यात आले. मातृभाषा अध्यापक संस्था, पुणे या संस्थेच्या अध्यक्षा स्मिता ओव्हाळ यांनी प्रास्ताविक केले. संस्थेतील पदाधिकारी संध्या माने, वंदना आणेकर निमल, गीताभारती, निफाडकर मंगल, पढेर विकास शामला पंडित (दीक्षित), सुरेखा लेंभे, सोनवणे सुरेखा, जगताप सुजित, गायके संभाजी, पिंगळे संजय, सुरळकर सुलभा, शारदा पानगे यांचे कार्यक्रम सुनियोजित पार पाडण्यासाठी सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रफुल्ल मुक्कामावर यांनी सिंगापूर या देशात मराठी शिकवण्याचे अनुभव सांगितले.शालेय वयापासूनच आपल्यातील कौशल्य ओळखून स्वतःचा व्यक्तीमत्व विकास साधावा. प्रमुख पाहुणे मयुरा डोळस यांनी अभिनय क्षेत्रात नेमकं काय करावं यासाठी मार्गदर्शन केले. संभाजी गायके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.लेखक आणि कवी मा.प्रफुल्ल मुक्कावार .त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मा.मयुरा डोळस या उद्योजिका, लेखिका, दिग्दर्शिका यांचे मार्गदर्शन लाभले नवीन काही तरी शिकत राहिले पाहिजे. हे आजच्या काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा या काळात अनेक कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे. डी इकॉनॉमी समजून घ्या, त्याचा भाग बना. एकाच आयुष्यात खूप गोष्टी करायच्या आहेत. स्वतःची आवड ओळखा. सुरेखा लेंभे यांनी सूत्रसंचालन केले कार्यक्रमाचे आभार संजय पिंगळे यांनी मानले.

# जवाहर नवोदय विद्यालयांच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळावी - खा.हेमंत सवरा

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.६, जव्हार (पालघर) :** आज दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५, लोकसभेत मा. खासदार हेमंत विष्णु सवरा यांनी नियम ३७७ अंतर्गत जवाहर नवोदय विद्यालयातील शिक्षकीय आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पेन्शन मागणीचा मुद्दा प्रभावीपणे मांडला.

यावेळी मा. खासदार सवरा म्हणाले, मी स्वतः जवाहर नवोदय विद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्यामुळे, या विद्यालयातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांशी माझा सतत संवाद असतो. संपूर्ण देशभरात ५९० नवोदय विद्यालये कार्यरत आहेत आणि येथे कार्यरत असलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळावा, ही त्यांची जुनी आणि न्याय्य मागणी आहे.

जवाहर नवोदय विद्यालय हे केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत कार्यरत असलेले स्वायत्त संस्थान आहे. येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम, १९७२ अंतर्गत पेन्शनसाठी मागणी केली आहे.

मात्र, हा विषय शिक्षण मंत्रालयात अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

केंद्रीय तिबेटी शाळा, राष्ट्रीय मुक्त विद्यालय (NIOS), इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU), NCERT आणि अन्य स्वायत्त संस्थांमधील कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ दिला जातो, मात्र जवाहर नवोदय विद्यालयांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांना अद्याप हा लाभ मिळालेला नाही, ही बाब अन्यायकारक आहे.

देशाचे शिक्षण मंत्री सकारात्मक विचारांचे आणि निर्णयक्षम नेतृत्व करणारे मंत्री आहेत. त्यामुळे या पेन्शन मागणीवर त्वरित पुनर्विचार करून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी मा. खासदार हेमंत विष्णु सवरा यांनी संसदेत केली.

# तायक्कांदो स्पर्धा संचालकांना अधिकार पुन्हा बहाल

## 'मॅच फिक्सिंग'चे आरोप खोटे असल्याचे न्यायालयाने फटकारले; दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, उत्तराखंड :** उत्तराखंड येथे सुरू असलेल्या ३८वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तायक्कांदो खेळाच्या स्पर्धा संचालकांना 'मॅच फिक्सिंग' चे खोटे आरोप करून जीटीसीसी ने पदावरून हटवले होते. या विरोधात तायक्कांदो फेडरेशन ऑफ इडियाने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागीतली व दिल्ली उच्च न्यायालयात कुठलाही पुरावा देता न आल्याने, उच्च न्यायालयाने स्पर्धेचे संपूर्ण अधिकार तायक्कांदो स्पर्धा संचालकांना व टीएफआय ला पुन्हा बहाल करण्याचा निर्णय दिला आहे.

**अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार !!**

तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या काही पदाधिकाऱ्यांची नावे घेऊन वृत्त पत्रांमध्ये 'मॅच फिक्सींग' सारखे खोटे आरोप करून तायक्कांदो खेळाची व फेडरेशनची प्रतिमा मलिन करणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्या विरोधात न्यालयात अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार आहे.तायक्कांदो खेळांमध्ये 'मॅच फिक्सींग' सारखे खोटे आरोप करून तायक्कांदो खेळाला बदनाम करणाऱ्यांना उच्च न्यायालयाची ही मोठी चपराक आहे.

**ॲड.आर.डी. मंगुयेशकर, तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया (महासचिव)**

तायक्कांदो खेळ ऑलिंपिक क्रीडा प्रकार असून हा खेळ सेन्सरवर खेळला जातो. यासह सर्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये संपूर्ण संगणक प्रणालीचा, अत्याधुनिक सेंसर चा वापर केला जात असल्याने स्पर्धेमध्ये कोणालाही मानवी हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे हा खेळ १०० टक्के संपूर्ण पारदर्शक आहे. तसेच तज्ञ प्रशिक्षकांसह खेळाडूंनाही स्वतःचे गुणांकन सामना सुरू असताना संगणक प्रणालीद्वारे मोठ्या पडद्यावर पाहता येते. प्रत्येक प्रशिक्षकालाही आपल्या खेळाडूच्या गुणांबद्दल काही आक्षेप असल्यास त्यांना तात्काळ दाद ही मागता येते. त्यामुळे या खेळात कधीच फिक्सिंग सारखे प्रकार होऊ शकत नाहीत.

**- डॉ.अविनाश बारगजे, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) (अध्यक्ष)**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धे दरम्यान तायक्कांदो स्पर्धा सुरू होण्याच्या पुर्व संध्येला तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजन समितीचे स्पर्धा संचालक प्रविणकुमार यांच्यावर 'मॅच फिक्सिंग'चे खोटे आरोप करून त्यांना या पदावरून हटविण्यात आल्याच्या बातम्यांमुळे खळबळ माजली होती. दिल्ली उच्च न्यायालयाच्या गुरुवारी आलेल्या या निर्णयामुळे तायक्कांदो खेळाला बदनाम करणाऱ्यांना मोठी चपराक बसली आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तांत्रिक समिती (जीटीसीसी) यांनी आरोप असलेल्या टी. प्रवीणकुमार यांना तत्काळ हटवून एस दिनेशकुमार यांची नियुक्ती केली होती.

या विरोधात तायक्कांदो फेडरेशन ऑफ इडियाने (टीएफआय) दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागितली होती. यावर न्यायालयाने सुनावणी करत स्पर्धेचे संपूर्ण अधिकार तायक्कांदो

फेडरेशन ऑफ इंडिया व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उतराखंड २२५ तायक्कांदो स्पर्धा संचालकांना पुन्हा बहाल केले आहेत, तसेच 'टीएफआय'ला अधिकृत राष्ट्रीय फेडरेशन (एन.एस.एफ) म्हणून स्पर्धा आयोजनाची संपूर्ण जबाबदारी बहाल केली आहे.

त्यामुळे तायक्कांदो खेळाला 'मॅच फिक्सींग' सारखे शब्द वापरून खेळाला बदनाम करणाऱ्यांनी कुठल्याही पुराव्याशिवाय केलेले आरोप उच्च न्यायालयाने फेटाळले आहेत.

'टीएफआय'कडून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या व 'जीटीसीसी'कडून या खोट्या आरोपांमुळे स्पर्धेतील नियुक्ती रद्द करण्यात आलेल्या २० ऑफिशीयल, पंचांनाही पुन्हा नियुक्ती बहाल करण्यात आलेली आहे.

# पुरंदर मेडिकल असोसिएशनच्या वतीने जेजुरी पोलिसांची आरोग्य तपासणी

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०६, जेजुरी (पुणे) :** २४ तास समाजाची सुरक्षितता तसेच कायदा व सुव्यवस्थेचे काम करणाऱ्या पोलीस बांधवांचे आरोग्य चांगले राहावे या हेतूने पुरंदर मेडिकल असोशियशनच्या वतीने जेजुरी पोलीस स्टेशन मधील पोलीस बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

पुरंदर मेडिकल असोसिएशन व जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जेजुरी पोलीस स्टेशनच्या मार्तंड सभागृहात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पुरंदर मेडिकल असससिएशनचे अध्यक्ष डॉ.प्रवीण जगताप, जेजुरी पोलीस स्टेशनचे स पो नी दीपक वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पुरंदर मेडिकल असोसिएशनच्या वतीने दरवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकरी, शालेय विद्यार्थी, दिव्यांग यांच्या आरोग्य सेवेसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच समाजाच्या सुरक्षिततेसाठी २४ तास ड्युटी तसेच कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस बांधवांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी हे शिबिर आयोजित केले असल्याचे असोसिएशनचे सचिव डॉ.सुमित काकडे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले.



या आरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, हृदयरोग, दंत, मधुमेह, स्त्री आरोग्य तपासणी, त्वचारोग, आदी आजारांची तपासणी करून औषोधपचार करण्यात आले.

पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.प्रवीण जगताप, उपाध्यक्ष डॉ.शमा केंजळे, डॉ.सचिन निरगुडे, सचिव डॉ.सुमित काकडे, डॉ.नितीन केंजळें, डॉ.उमाकांत ढवळे, डॉ.अस्मिता पोखरणिकर, डॉ.वृषाली जगताप,डॉ निनाद खळदकर, डॉ.सुनील बोत्रे, डॉ. स्वप्नील महाजन, डॉ.संजय गळवे, डॉ. प्रदीप मगदूम, डॉ.जयश्री होले आदींनी ही आरोग्य तपासणी केली.

# मौजे हरडफ येथे ५२ धम्म मेळाव्याचे आयोजन; संयोजन समिती गठीत...

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०६, हदगाव (नांदेड) :**

हदगाव तालुक्यातील हरडफ येथे महाप्रजापती धम्म किर्ती महिला मंडळ व नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने १२ फेब्रुवारी रोजी होत असलेल्या धम्म मेळाव्याची संयोजन समिती गठीत करण्यात आली असून यासाठी धम्म ज्योती बुद्ध विहार हरडफ येथे मिटिंग घेऊन सर्वानुमते बिनविरोध संयोजन समितीची निवड करण्यात आली.

या समितीमध्ये अध्यक्ष विक्रात वाठोरे, उपाध्यक्ष संदिप रायघोळ, सचिव कपिल वायवळ, कोषाध्यक्ष सिध्दार्थ वाठोरे पत्रकार, माधव आढागळे, सहसचिव शेषेराव वाठोरे, नितेश वाठोरे तर सदस्य म्हणून प्रताप वाठोरे, प्रवेश वाठोरे, रविरज वाठोरे, सिद्धार्थ वाठोरे, आदींची निवड करण्यात आली.

हरडफ येथे गेल्या ५१ वर्षापासून धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात येते तालुक्यात नव्हे तर संबंध जिल्ह्यातील व परिसरातील सर्वात पहिला धम्म मेळावा प्रसिद्ध आहे. या मेळाव्यास राज्यातील व परराज्यातील उपासक उपस्थित राहतात. त्यामुळे एक महिन्यापासून मेळाव्याची तयारी केली जाते.

जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध असलेला धम्म मेळावा हरडफ या गावांमध्ये मोठ्या उत्साहामध्ये साजरा -केला जातो यावर्षी १२ फेब्रुवारी रोजी धम्म मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्रामध्ये पंचशील ध्वजारोहण सकाळी ९ वाजता धम्म किर्ती महिला मंडळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता धम्मदेशना उपासक आर. व्ही. वाठोरे, गणपत वाठोरे, यांची धम्मदेशना होणार आहे.

द्वितीय सत्रात दुपारी साडेबारा वाजता गावातील प्रमुख रस्त्याने तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्राची मिरवणूक निघणार आहे. सायंकाळी ७ वाजता प्रबोधन पर्वामध्ये वक्ते म्हणून प्रा.डॉ. पंजाबराव शेरे व संगीताताई कासारे यांचे व्याखान होणार आहे.

रात्री ९ वाजता तिसऱ्या सत्रामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक युवा विद्रोही प्रबोधनकार सुरज अतिष संच मुंबई, सुप्रसिद्ध गायिका निशा धोंगडे संच चंद्रपूर यांचा बुद्ध भीम गीताचा कार्यक्रम होणार आहे. तरी परिसरातील सर्व जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समिती धम्म किर्ती महिला मंडळ व नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# तरुणाईत नवनिर्मितीची क्षमता हाच विकसित भारताचा विधायक मार्ग - प्रा.कोमल चौधरी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०६, खंडाळा :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत बीसीए व गणित विभाग आयोजित पायथनच्या मूलभूत संकल्पना विषयावर आज दि.०६ फेब्रुवारी २०२५ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासाठी किसन वीर महाविद्यालय, वाई बीसीए विभागात कार्यरत असणाऱ्या प्रा.कोमल चौधरी यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.




प्रारंभी अग्रणी महाविद्यालय योजेनेच्या प्रमुख प्रा.नयना ओंबळे यांनी स्वागत केले.मार्गदर्शन करताना प्रा.चौधरी म्हणाल्या-आजच्या दैनंदिन जीवनात प्रत्येकजण स्मार्ट तंत्र-आयुधांचा वापर करतो, याद्वारे वापरकर्ते आणि तंत्रज्ञान यांचा सहसंबंध समजून घेण्यासाठी तंत्रज्ञानाची भाषा म्हणजे पायथान, जावा, सी प्लस, इ.प्रोग्राम भाषा प्रकार असून समजून घेत त्यांच्या वापरातून नवनिर्मितीच्या संकल्पना समजून घेत भाषेचा विधायक वापर करून विकसनशील भारताला विकसित करण्यासाठी व्हावा, फक्त पुस्तकी अभ्यासावर भर न देता भविष्यातील तंत्रज्ञान संधीचा शोध घेत विदा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रातील कौशल्ये मिळवावीत असे आवाहन केले.

प्रास्ताविक करताना बीसीए विभागप्रमुख प्रा.काजल पाटील म्हणाल्या-वर्तमान विद्यार्थी निमित्ताने अभ्यास करतो, परीक्षार्थी होतो पायथन आणि तत्सम भाषा शिक्षणाचे प्रत्यक्ष पदवी घेतल्यावर महत्व समजून घेण्यासाठी आजची कार्यशाळा आयोजित केली आहे. अध्यक्षीय मनोगतात अग्रणी महाविद्यालय योजना प्रमुख प्रा.नयना ओंबळे म्हणाल्या-वर्तमानात अभियांत्रिकी पदवी-पदविका, व्यावसायिक पदवीधर युवा यांत्रिकी क्षेत्रात काम करताना पॅकेजचा करतो, कष्टाला कमी पडतोय. नवनिर्मितीची उर्मी असूनही नविन कौशल्य शिकण्यासाठी प्रयत्न करत नाही, पण भविष्यात अनेक क्षेत्रात नविन संधी आहेत. यासाठी आतापासून प्रयत्न करत स्वयंसिद्ध व्हावे. या कार्यशाळेसाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा.भारती चव्हाण, इतिहास विभाग प्रा.रोहिणी मोरे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रा.ऋतुजा नवसरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अक्षय वाघापुरे यांनी केले.

उपस्थित मान्यवर, विज्ञान व बीसीए विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आभार प्रा.अमीर इनामदार यांनी मानले.

# थोडक्यात

## अतिक्रमण हटाव कारवाईस पालिकेचे सहकार्य

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.०५, पनवेल :** पनवेल महापालिकेच्या सहकार्यातून दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी सिडकोच्या माध्यमातून रोडपाली गाव व मार्बल मार्केटमध्ये अतिक्रमण कारवाई करण्यात आली. यावेळी रोडपाली गावातील डीडीचा ढाबा व मार्बल मार्केट येथील अतिक्रमणावर सिडको प्राधिकरण व पनवेल महानगरपालिका द्वारे संयुक्त कारवाई करून तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी सिडको अनधिकृत बांधकाम निष्कासन विभागातर्फे लक्ष्मीकांत डावरे व सिडको अतिक्रमण पथक कर्मचारी महापालिकेचे अतिक्रमण उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, प्रभाग ब प्रभारी अधिक्षक, प्रभाग समिती ब स्टाफ व अतिक्रमण पथक उपस्थित होते. या अतिक्रमण कारवाईमध्ये रोडपाली गावातील डीडीचा ढाबा मार्बल मार्केटमधील अनधिकृत व्यवसाय करणारे ८ शेड, अनधिकृत १०-१५ झोपड्यांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. दोन जेसीबीच्या साहाय्याने करण्यात आलेल्या या कारवाईवेळी सिडकोच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## माघी यात्रेसाठी चंद्रभागा नदीपात्रात भाविकांना सोडले पाणी

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०६, पंढरपूर :** माघ शुध्द एकादशी दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून माघ यात्रा कालावधी दिनांक ०२ ते १२ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते. श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. भाविकांना चंद्रभागा भागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पूला जवळील बंधाऱ्यातून २४० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे. चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याने व जास्त काळ पाणी साठून राहिल्याने पाण्यावर शेवाळे येऊन पाणी जास्त काळ साठल्याने पाणी घाण झाले होते. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी तातडीने कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग व पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करून गुरसाळे व नगर परिषदेच्या बंधारे मधून तातडीने ६ दरवाजे उघडून नदी पत्रामध्ये पाणी सोडण्याबाबत सूचना दिल्या. त्या अनुषंगाने गुरसाळे बंधाऱ्यातून व नगर परिषदेच्या बंधार्यामधून भाविकांचे सोयीसाठी बंधाऱ्याचे ६ दरवाजे उघडून चंद्रभागा नदीपात्रामध्ये पाणी सोडण्यात आल्याने व माघी यात्रेमध्ये भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध झाल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. तसेच नदीपात्रामध्ये सध्या पाण्याची रिसायकलिंग करून पाणी स्वच्छ करण्याची यंत्रणा बसवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून सदरची यंत्रणा आषाढी यात्रेपूर्वी कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाने दिली आहे.

## दापोलीत नव्या बसेसला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०६, दापोली (रत्नागिरी) :** दापोली आगाराला नव्याने उपलब्ध झालेल्या बीएस ६ प्रणालीच्या बसेस लांबपल्ल्याच्या मार्गावर सोडल्या जात असून त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद लाभत असल्याची माहिती येथील एस.टी.आगारातून देण्यात आली. यामध्ये सकाळी ६.३० वाजता दापोली - नाशिक -धुळे व पहाटे ५.१५ वाजता धुळे नाशिक - दापोली या मार्गावर दोन बस, सकाळी ६ वाजता दापोली - मुंबई, ६.३० दापोली जलद रत्नागिरी, सायंकाळी ४ वाजता दापोली - चिपळूण, १० वाजता दापोली - मंडणगड - भाईदर, ९.३० वाजता दापोली - खेड - भाईंदर, सकाळी ९.३० वाजता दाभोळ - मुंबई, रात्री ९.४५ दाभोळ - मुंबई अशा मार्गावर ८ बसेस धावत आहेत. या सर्व बसेसना प्रवाशांचा प्रतिसाद मिळत आहे.

## प्रा.आ.केंद्रात शवागृह नसल्यामुळे मृतदेहाची होत आहे हेळसांड

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०६, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथे गेले कित्येक वर्षापासून शवागृह उपलब्ध नसल्याने मृतदेहांची हेळसांड होत आहे. तर यासाठी लोकप्रतिनिधीसह प्रशासनाने पाठपुरावा करणे गरजेचे आहे. कुंडलवाडी व आजूबाजूस असणारी खेडी, अनेकदा अपघाती किंवा बेवारस, जलनिमंजन (ड्रॉनिग) मृतदेह ठेवण्यासाठी शवागृह उपलब्ध नसल्याने मृतदेहाची हेळसांड होत आहे. कुंडलवाडी शहरात नगरपालिका असून सुद्धा पण शवगृह उपलब्ध नाही. कुंडलवाडी येथील अनेक कुटुंबातील नातेवाईक कामानिमित्त परराज्यात वास्तव्यास आहेत. अशावेळी त्यांच्या कुटुंबात एखाद्याचा मृत्यू झाल्यास मुंबई /पुणे/ हैद्राबाद अथवा परराज्यात असणारा नातेवाईक येईपर्यंत अनेक तासं तास मृतदेह तसाच ठेवावा लागत आहे. नातेवाईक कुंडलवाडी गावात पोहोचेपर्यंत काही तासांसाठी मृतदेह शवागृहात ठेवता यावा. बरेच वेळेत गंगेत पडल्यामुळे ओळख लवकर पटत नसते. अशा वेळेस तो मृत्यूदेह सुरक्षित रहावा, नातेवाईकाला आप्तेष्ट जणांना अंत्यविधी करण्यात यासाठी वेळ मिळावा. यासाठी शवगृह अत्यंत महत्त्वाचे आहे. पण राजकीय उदासीनता व अधिका-यांचे दुर्लक्ष यातून शवागृह उपलब्ध होत नाही शासकीय जिल्हा नियोजन समितीच्या फंडातून शवागृह उपलब्ध व्हावे. यासाठी नागरिकांकडून मागणी होत आहे.

## विंचूर उपबाजारसमितीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी निवेदन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** अल्पावधीतच भारत देशात नावाजलेली विंचुर उपबाजार समिती या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होत असल्या कारणाने या ठिकाणी जागा ही कमी पडत आहे. तसेच यामुळे नाशिक संभाजीनगर राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात ट्राफिक चा अडथळा निर्माण होत आहे. वाहनांच्या लांबच - लांब रांगा लागत असतात. या उपबाजार समितीने शेतकरी बांधवांच्या सोई - सुविधेच्या दृष्टीने मौजे सुभाषनगर, ता.निफाड येथील ग्रामपंचायतीच्या ताब्यात असलेली ०८ हेक्टर ६१.५६ आर जागा शासकीय दराने संपादित करण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे प्रलंबित आहे. याबाबतची फाईल मागवून या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी. असे निवेदन माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिले आहे.